


कविमन

हनुबाब

॥ ग्रन्थ एव गुरुः ॥

eBook Publication Pvt. Ltd.
February 2019

कविमन

हनुबाब

eBook Publication Pvt. Ltd.

प्रथमावृत्ती - फेब्रुवारी २०१९

कविमन

‘हनुबाब’ उर्फ श्री. हनुमंत ह. रेडकर

(havhanubab@gmail.com)

प्रकाशक:

eBook Publication Pvt. Ltd.

4/47, उदय को. हौ. सोसायटी,

आरे रोड, गोरेगाव पश्चिम,

मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००६२

Telephone: +91 7038164022

Email: publicationebook@gmail.com

प्रथमावृत्ती: **५ फेब्रुवारी २०१९**

मुखपृष्ठ:

Razzel Design

Graphic & Website Designer

M: +91-9773699050

www.razzeldesign.com

www.facebook.com/RazzelDesign

eBook Terms & Conditions

1. This eBook* may be

a. Distributed without modification or sale.

b. Copied for personal and educational use.

c. Printed for personal and educational use.

2. This eBook* may NOT be

a. Sold individually or as part of package.

b. Modified in any way.

c. Reversed-engineered.

*eBook refers to this PDF and any of its content including pages and images in either electronic or printed form.

माझं हे पहिलं वहिलं पुस्तक
माझ्या 'आई-बाबांना' अर्पण करतो.
तुमचा आशीर्वाद सदाकाळ
माझ्या पाठीशी असू द्या.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

जाणीव व बुद्धी यांच्यामुळे घडणाऱ्या ज्ञान, विचार, मत, स्मरणशक्ती, भावना, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, चेतना या गोष्टी ज्या ठिकाणी होतात ते ठिकाण म्हणजे मन. या सर्व गोष्टी या मेंदूद्वारे होणाऱ्या प्रक्रिया आहेत. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये व तत्त्वज्ञानामध्ये मनाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. पण या सार्वत्रिक आढळणाऱ्या मना व्यतिरिक्त अजून एक मन असते ते म्हणजे कविमन. हे कविमन फारच अजब असून या जगात सर्वात अनाकलनीय अशी ही गोष्ट आहे. बहिणाबाई म्हणतात -

मन मोकाट मोकाट
त्याले ठायीं ठायीं वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्यारे लाटा

हे वर्णन मानवी मनाला जितकं चपखल लागू पडतं त्याहूनही अधिक ते कविमनाला अधोरेखित करतं असं मला वाटतं. आणि म्हणूनच आदिकाव्य रामायण तेही या कविमनाच्या जाणिवेची फलश्रुती आहे; जी महर्षी वाल्मीकी यांच्या मुखातून काव्य रूपातून प्रकट झाली. तेव्हापासून चालत आलेली ही काव्य परंपरा आजच्या काळापर्यंत पोहोचली असून त्यामध्ये कालपरत्वे, स्थलपरत्वे जी स्थितंतरे घडली ती विभिन्न कवींनी आपापल्या काव्यातून अभिव्यक्त केलेली दिसून येतात. अशाच परंपरेचा पाईक होण्याचा प्रयत्न या

"**कविमन**" नामक काव्य संग्रहातून 'हनुबाब' उर्फ श्री. हनुमंत ह. रेडकर यांनी केलेला आहे.

काव्यरसिकांसमोर **कविमना**च्या रूपाने "**कविता हा विचारांचा भांडार**" असे म्हणत "**जीवन काय आहे**" हे प्रत्येकाला कधी न सुटलेलं "**आयुष्याचे कोडे**" सहज साध्या शब्दात मांडत "**प्रेमावर विश्वास ठेवा, प्रेम जिंकणारच**" असा विश्वास मनात जागवत त्यांनी हे जीवन "**कुणासाठी तरी**" अर्पण केलं पाहिजे असं स्पष्ट करून "**चला जगणे सुंदर करूया**" अशी अखिल मानवतेला साद घातली आहे; कारण त्यांना ठाऊक आहे की, "**गरीब कसा असतो**" म्हणून ते सर्वांना आश्वासन देऊ इच्छितात की मित्रांनो, "**सगळं सफल होईल, दिस चांगले येईल**"

या तात्त्विक विचारसरणी बरोबरच या "**कविमना**"त आपल्याला "**सकाळी तुझी भेट झाली नि**" अशी काव्य निर्मितीचा कैफ आणणारी प्रेम कविता देखील अनुभवास येते आणि "**सांग सखे होणार का माझी परी?**" असं म्हणतं आदर्श नातं जोपासण्याचा मानसही कळून येतो.

या साऱ्या **काव्यमना**त डोकावताना आपल्याला शब्द रचना ही अत्यंत स्वाभाविक, सहज आणि सोपी आहे हे जाणवेल. साध्या, सोप्या शब्दात काव्य मांडणे हेच या कविमनाचे वैशिष्ट्य आहे. याच बरोबर मला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की हे **कविमन** कोंकणी असूनही मराठीमध्ये कसे रमले आहे ते पाहून खूप अभिमान तर वाटतोच पण काही शब्द जसे '**माघारू'** म्हणजे कवी म्हणतो,

प्रेमाला कधीच नाकारू नका

प्रेम करतच रहा, माघारू नका

येथे माघार घेऊ नका यासाठी सुरेख शब्द प्रयोग केला आहे. तसेच '**व्यक्तवेल**', '**कवितेतून व्यक्ती स्वतःला व्यक्तवू शकतो**', इत्यादी स्थाने ही मनाला काहीशी शब्द वेल्हाळ करतात.

अखेरीस एकच म्हणता येईल की ज्ञानेश्वर माऊली म्हणतात तसे

जयांचिया आस्थेचिया सद्भावा ।

आंतु धर्म करि राणिवा ।

जयांचें मन ओलावा । विवेकासी ॥ ज्ञाने.९.१८९ ॥

असा कविमनाचा ओलावा आपणांस जाणवून विवेकाची प्रत्येकाने कास धरून "**सगळं सफल होईल**" म्हणून "**चला जगणे सुंदर करूया**".

बाकी यशापयशाची चिंता कशाला ग.दि. मा. म्हणतात तसे

काय धनाचे मूल्य मुनिजना

अवघ्या आशा श्रीरामार्पण.... (गीत रामायण ५६)

- **डॉ. नीलेश जोशी वैशंपायन**

मुंबई

मनातलं

मन हे विचारांचं भांडार असल्या कारणाने माझ्या मनात अनेक विचार येतात. आणि ते विचार कवितांच्या रूपात माझ्या मुखी प्रकटतात. विचारांचा हा संगम कधी काल्पनिक असतो तर कधी वास्तविक. पण, माझ्या मनात जे काही येतं ते मी मला जमेल तसं कवितांच्या रूपात कागदावर उतरवून काढण्याचा साधा व सरळ प्रयत्न करतो. तसेच, माझ्या अवती-भवती असे अनेक प्रसंग घडतात, अशा अनेक गोष्टी घडतात, अशी अनेक करमणूक घडते, त्यातूनच माझ्या मनात काव्य रचलं जातं. मी कविता लिहिताना कधीच विचार करत नाही. विषय समोर आला की आपोआप कविता घडतात. मग तो विषय करमणुकीचा असो वा प्रासंगिक, हास्यमय असो वा गंभीर, भावनात्मक असो वा तात्विक, मी सहजच लिहायला जातो, आणि लिहिता लिहिता नकळतच एक सुंदर असा ओळ्यांचा समूह बनतो. त्यातूनच माझी कविता बनते, आणि त्यातूनच माझ्यातला कवी जन्मतो.

पुस्तक लिहिण्याचा विचार बरीच वर्ष माझ्या मनात घोळत होता, पण वास्तवात आणण्यास बराच वेळ सरकला. '**कविमन**' या छोट्याशा कवितामाळेत हा विचार साकार होताना मला दिसत आहे. मला लहानपणापासून पुस्तकं वाचण्याची बरीच आवड होती, आणि त्यामुळेच मी साहित्याच्या दिशेने झुकत गेलो. पण गद्य साहित्याकडे न

वळता मी पद्याकडे वळलो गेलो. लहानपणापासून मला अवती-भवतीतील गोष्टी निरीक्षणाची सवय होती. छोट्या-छोट्या गोष्टीत मी विषय शोधत असायचो. आणि ती सवय कायमस्वरूपी माझ्यात राहिली. जसजसा मी मोठा होत गेलो मला आयुष्यातील अनेक गोष्टीना सामोरे जावे लागले. आणि एक एक गोष्ट मला कवितामय वाटायला लागली, भलं ती चांगली असो वा वाईट, प्रत्येक गोष्टीत मला कविता दिसायला लागल्या, सुचायला लागल्या आणि घडायला पण लागल्या, पण लिहिण्याचं धाडस हल्लीच करायला गेलो. मला शीघ्र कविता करायला खूप आवडतात, आणि त्यातूनं असा मी **'शीघ्रकवी'** तयार झालो.

'**कविमन**' हे पुस्तक लिहिताना मला बहुतांश लोकांनी मदत केली. या '**कविमना**'ला अशा कित्येक लेखक, कवी, साधी माणसं, प्रेमळ माणसं, दुष्ट माणसं यांचा हातभार लाभलेला आहे. सगळ्यांची नावं इथे लिहिणं शक्य नाही. तरीही मला माझ्या **कविमन** सफरीत साथ देणाऱ्या आणि प्रत्येक पाऊली प्रोत्साहनकारी मदत आणि समर्थन देणाऱ्या डॉ. नीलेश जोशी यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. तसेच, साहित्यक्षेत्रातील पहिलं पाहुल टाकण्यास प्रोत्साहन देणारा माझा मित्र श्री. नरेश नाईक याचा मी आभारी आहे. माझ्या आयुष्यात खेळाडूवृत्ती जागवणाऱ्या श्री. प्रवीण चावरे याचे पण मी आभार मानतो. श्री. राम धस

याने या पुस्तकाला एक सुंदर मुखपृष्ठ दिल्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. '**eBook Publication Pvt. Ltd.**' या प्रकाशन संस्थेचे मी खूप खूप आभार मानतो कारण त्यांच्या याच मदतीमुळे आज हे माझं '**कविमन**' तुमच्या पर्यंत पोहोचले आहे.

आशा करतो की ही छोटीशी कवितामाळ, माझं **कविमन,** तुमच्या रसिक मनाला भावेल.

हनुबाब
गोवा
९०४९०८३०२५

कविता हा विचारांचा भांडार

कविता हा एक विचारांचा भांडार
आज एक तर उद्या अनेक घडणार
एक संपली की दुसरी सहज येणार
लिहिण्यासाठी द्यावा विचारांना आकार

एकदा लिहायला सुरुवात केली तर
संपण्यापर्यंत ती लिहावीशी वाटणार
एका मागून एक शब्द सहज सुचणार
आणि तुमची कविता नकळत रुजणार

सुरुवातीला शब्द शोधावे लागणार
नंतर तेच शब्दच तुम्हाला शोधणार
शब्द लिहिता लिहिता तुम्ही स्वतःला विसरणार
शब्दांची माळ गुंतता एक असामान्य कविता घडणार

कवितेने माणूस विचार प्रकट करू शकतो
कवितेतून व्यक्ती स्वतःला व्यक्तवू शकतो
स्वतःमधून स्वतःला काढून मनमोकळा होऊ शकतो
आणि शब्दशक्तीने जगाला भाव विभोर बनवू शकतो

पक्ष्यांचा हा किलबिलाट

संध्याकाळी त्या क्षितीजवर
सूर्य आहे परतीच्या वाटेवर
चंद्र हळू-हळू उगवतोय वर
तेव्हाच बहरतो पक्ष्यांचा किलबिलाट

चिमणी चिव-चिव करते
कावळा काव-काव करतो
आणि इतर पक्ष्यांच्या मदतीने
एक अविस्मरणीय स्वर बनतो

संध्याकाळच्या या क्षणात
पक्ष्यांचा हा किलबिलाट
मनाशी हितगूज करतो
आणि जीवाला रमवून टाकतो

पक्ष्यांच्या या सहवासात
सुरांच्या या मैफिलीत
सुंदर अशा या वातावरणात
जन्मतो विलक्षण चिवचिवाट

वाटतं आज इथेच राहावं
निसर्गाच्या या सुरात रमून जावं
या अप्रतिम क्षणात मोहरून जावं
आणि असच मनमोकळेपणाने जगावं

सकाळी तुझी भेट झाली नि

काही कळेना आज, कसं हे घडलं
जीवाला अगदी, वेड्यावानी वाटलं
सकाळी सकाळी, तुझी भेट झाली
नि मनातली कळी, हळूच खुलली

काळीज संगीतमय गाणं गायला लागलं
ओठावरती स्मित सहजच यायला लागलं
मनाला एकदम प्रसन्न झाल्यासारखं वाटलं
क्षणभर कसं सगळंच मोहरल्यासारखं झालं

दिवस हा कसा सुंदर रंगतच गेला
गालावर माझ्या हास्य फुलवत गेला
मनात एक हलकीशी आशा ही जन्मली
हे जीवन जगण्याची पुन्हा उर्मी आली

अशी सकाळी भेट तुझी ही झाली
बंद पडलेली दारं नकळत उघडली
माझ्या कविमनाला जाग ती आली
नि माझीच मला नव्याने भेट झाली

सांग सखे होणार का माझी परी?

सांग सखे होणार का माझी परी
सांग सखे येणार का माझ्या घरी
येशील का गं माझ्या प्रेमाच्या देशी
घेशील का गं माझ्या प्रेमाला उराशी

मी तुला हसवणार, मी तुला खेळवणार
मी तुला रडवणार, मीच तुला सावरणार
गप्पा गोष्टी करणार, माझ्या कवितांनी बनवणार
मनातल्या भावना सांगणार, मनातील भावना समजणार

तुला चांगल्या गोष्टी शिकवणार
तुझ्याकडून बऱ्याच गोष्टी शिकणार
तू मला समजवणार, मी तुला समजणार
एकामेकांना समजून आपण आयुष्य जगणार

आपल्या मध्ये वादविवाद होतच राहणार
कारणं शोधून आपणच त्यांचं निवारण करणार
कमीतकमी वाद-विवाद करायचा प्रयत्न करू
अधिकाधिक आनंद साजरा करायला शिकू

चल आपलं आयुष्य सुंदर करूया
आपलं नातं सफल उदाहरण बनवूया
नातं आपलं साकार आनंदी घडवूया
एकमेका बद्दल प्रेम असच वाढवूया

मग काय ठरवलंस?
येणार ना गं सखे माझ्या घरी?
होणार ना गं माझ्या जीवनातली परी?

प्रेमावर विश्वास ठेवा, प्रेम जिंकणारच

प्रेमावर विश्वास ठेवा, प्रेम जिंकणारच
आज जर दिसत नाही, उद्या दिसणारच
फक्त प्रेम करतच रहा, प्रेमात बुडून जा
अपेक्षा कमी करा, फक्त प्रेम करतच रहा

कधी ना कधी तुमचं प्रेम तुम्हाला भेटेल
जे काही अधुरं बोलणं राहिलं ते व्यक्तवेल
प्रेम डोळे सांगतात, माणूस सांगत नाही
प्रेम असेल तर दिसणार, नाही तर नाही

प्रेमाला कधीच नाकारू नका
प्रेम करतच रहा, माघारू नका
खरं प्रेम कराल तर साकारणारच
प्रेम करतच जा, यशस्वी होणारच

प्रेम माणसाला जगायला शिकवतं
प्रेम माणसाला जिवंत ठेवतं
चला एकामेकांवर प्रेम करुया
सगळ्यांना प्रेमाधार देऊया

शोधत असतो मीच मला

शोधत असतो मीच मला
या अंधाऱ्या काळोखात
सापडत नाही मलाच मी
या धूसरलेल्या जगात

कुठे तरी हरवलेलो आहे
कुठे तरी भ्रमलेलो आहे
गुंतलेलो आहे मी प्रश्नांच्या जाळ्यात
गुदमरलेलो आहे आयुष्याच्या तळ्यात

चालत असतो मी असा एकटाच काळोखात
वाट जीवनाची ही शोधत असतो अंधारात
कधी इकडे आदळतो तर कधी तिकडे
प्रयत्न करतो सोडवण्याचे हे आयुष्याचे कोडे

प्रश्न असे अनेक पडतात
उत्तरं मात्र नाही सापडत
प्रश्नांचा हा घेऊन भार सारा
हिंडत असतो मी सैरावैरा

वाटतं आयुष्यात काही तरी करावं
एक तरी चांगलं कर्तृत्व करून मरावं
पण मिळतच नाही मला कसलीच संधी
तर मग सांगा, होईल कशी हो माझी प्रगती?

आता नाही मी असा गप्प बसणार
जीवनात अशी हार नाही मानणार
पुढे सरण्याचा प्रयत्न मी करतच राहणार
नाही मी थांबणार, नाही मी असा हरणार

गरीब कसा असतो

गरीब कसा असतो
तो कसा हसतो
तो कसा रडतो
मी पाहिलं आहे

गरिबी काय असते
काय काय करायला लावते
कसे जीवन जगायला लावते
मी पाहिले आहे

गरीब कसा जगतो
कसा जीवन व्यतीत करतो
कशा भावनांना मारतो
मी पाहिलं आहे

गरिबाचं मन कसं असतं
इतरांकडे कसा बघतो
इतरांकडून कसा दुरावतो
मी पाहिले आहे

तो धनाने जरी असला गरीब
पण नाही हो तो मनाने गरीब
तो बिचारा फक्त हरलेला असतो
काळापुढे लाचार झालेला असतो

गरिबाला तुम्ही थोडासा आधार द्या
त्याला मदत करा, आपला हाथ द्या
नका घेऊ त्याच्या लाचारीचा फायदा
कारण तो उठेल, सुधारेल, आणि पुढे सरेल

जीवन काय आहे

जीवन काय आहे
कुणाचं फुललेलं
कुणाचं बिघडलेलं
तर कुणाचं नाशाडलेलं

प्रत्येकाचं जीवन वेगळं असतं
कुणाचं खूपच सुंदर
कुणाचं एकदम खराब
तर कुणाचं याच्या मधलं

आपण येथे आलो एक उद्देश घेऊन
कुणाचा साकार झाला
कुणाचा बेकार झाला
तर कुणी अजून धडपडतोय

आपलं जीवन सदाकाळ आनंदी असावे
चांगल्या वाईट गोष्टींचा समतोल असावा
आयुष्यात बरं वाईट होतच राहणार
पण यातच आपलं आयुष्य घडणार

आयुष्याचे कोडे हे

आयुष्याचे कोडे हे, बोल सोडवावे कुणी
आज आईने सोडविले, तर उद्या बाबांनी
परवा मात्र आहे ते तुलाच सोडवायचे
आई-बाबा सगळीकडेच कुठे असायचे?

एका मागून एक कोडे
आयुष्यात तुझ्या येणार
सोडवण्यासाठी चल पुढे
नको घेऊ तू अशी माघार

प्रश्नां मागून प्रश्न पडतच राहणार
उत्तरं त्यांची नाही तुला सापडणार
पण सोडू नको असा धीर तू
उत्तरं सोडवूनच गप्प बस तू

प्रश्न ते सगळे मी सोडवणार
धर तू आता अट्टाहास असा
प्रश्न ते सगळे सोडवत असता
कर आता उत्तरांचा डोंगर उभा

प्रश्न सोडवण्याची प्रवृत्ती असल्यास
उत्तरं सहजच पडतील तुझ्या पदरात
आणि स्वताचे प्रश्न सोडवता सोडवता
सोडवणार दुसऱ्यांचे पण तू बिनधास्त

आयुष्याचे कोडे हे.... शेवटी स्वतःलाच सोडवायचे असते

मला एकदा तरी जगायचं आहे

मला एकदा तरी जगायचं आहे
एकदातरी आयुष्यात जिंकायचं आहे
एकदातरी मनमोकळेपणे हसायचं आहे
एकदातरी मनातून आनंदी व्हायचं आहे

जीवन काय आहे ते पूर्णपणे जाणायचं आहे
जीवनातले प्रत्येक सुख-दुःख अनुभवायचे आहे
दिवस-रात्र अपार परिश्रम करायचे आहे
ही जीवनयात्रा मधुर, आनंदमय बनवायची आहे

मला माझ्यातला माणूस जागवायचा आहे
लोकांना सहजपणे मदत करायची आहे
जगात चांगले कार्य पसरवायचं आहे
असंख्य माणसांचं जीवन घडवायचं आहे

माझ्यामध्ये अप्रतिम क्षमता आहे
इतरांसाठी काही करण्याचे ध्येय आहे
माझ्या या जीवनसृष्टीला मदत होणार आहे
असं काहीतरी करण्याची इच्छा बाळगत आहे

माझा या जगात येण्याचा काहीतरी उद्देश आहे
ह्याच उद्देशाची सार्थकता मला करायची आहे
स्वतःबरोबर दुसऱ्यांनाही यशस्वी करायचे आहे
या जगाला माझं सर्वस्व अर्पण करायचे आहे

कुणासाठी तरी

कुणासाठी तरी
आपला हा देह
उपयोगी पडावा

कुणासाठी तरी
आपल्यातला मोह
सोडून द्यावा

कुणासाठी तरी
आपल्यातल्या इच्छा
अव्यक्त रहाव्या

कुणासाठी तरी
आपल्या त्या भावना
कोंडून ठेवाव्या

कुणासाठी तरी
आपल्यातले प्रेम
अर्पण करावं

कुणासाठी तरी
आपले ते सर्वस्व
सहजच त्यागावं

कुणासाठी तरी
आपले हे आयुष्य
पणाला लावावं

कुणासाठी तरी
आपण हे जीवन
निस्वार्थपणे जगावं

कुणासाठी तरी... कुणासाठी तरी

सगळं सफल होईल, दिस चांगले येईल...

दिवस असे जातील सखे
दिवस असे येतील सखे
खेळ जीवनाचा चालतच राहणार
कधी हसवणार तर कधी रडवणार

दोन दिवस आपले असतात
या दोन दिवसात संपूर्ण जगूया
माणसांना माणसासारखं वागवूया
इतरांशी प्रेम-आदाराने बोलूया

वाईट व्हायला वेळ लागत नाही
पण बरं व्हायला बराच वेळ लागतो
जर कुणाच्या हृदयात जागा बनवायची असेल
तर सतत बऱ्या मनाने त्यांच्याशी वागावे लागेल
तेव्हाच,
सगळं सफल होईल, दिस चांगले येईल

चला जगणं सुंदर करूया

चला जगणं सुंदर करूया
मन शुद्ध आणि निर्मळ करूया
मरण्याआधी काही तरी चांगलं करूया
जीवनाची एक नवीन ओळख घडवूया

दिवस रात्र कष्ट करूया
सत्कार्याचं ध्येय धरूया
इतरांवर प्रेम करूया
एकमेकांना एक बनवूया

तुटणारी नाती जुळूवूया
जुळणाऱ्या नात्यांना फुलवूया
सगळ्यांना आनंदी करूया
सगळ्यामध्ये माणुसकी जागवूया

चला जगणे सुंदर करूया
आयुष्याला आदर्श बनवूया
दुःखांना सामोरे जाऊया
सुखी जीवनाचा पाया भरुया

काव्य रसिकांसमोर "कविमना"च्या रूपाने "कविता हा विचारांचा भांडार" असे म्हणत "जीवन काय आहे" हे प्रत्येकाला कधी न सुटलेलं "आयुष्याचे कोडे" सहज साध्या शब्दात मांडत "प्रेमावर विश्वास ठेवा, प्रेम जिंकणारच" असा विश्वास मनात जागवत त्यांनी हे जीवन "कुणासाठी तरी" अर्पण केलं पाहिजे स्पष्ट करून "चला जगणे सुंदर करूया" अशी अखिल मानवतेला साद घातली आहे; कारण त्यांना ठाऊक आहे की, "गरीब कसा असतो" म्हणून ते सर्वांना आश्वासन देऊ इच्छितात की मित्रांनो, "सगळं सफल होईल, दिस चांगले येईल"

या तात्त्विक विचारसरणी बरोबरच या "कविमना"त आपल्याला "सकाळी तुझी भेट झाली नि" अशी काव्य निर्मितीचा कैफ आणणारी प्रेम कविता देखील अनुभवास येते आणि "सांग सखे होणार का माझी परी?" असं म्हणतं आदर्श नातं जोपासण्याचा मानस ही कळून येतो.

- डॉ. नीलेश जोशी वैशंपायन

॥ ग्रन्थ एव गुरुः ॥

eBook Publication Pvt. Ltd.
February 2019